**निशाणी क्र. ५७**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

**माझे नाव — उषा हनुमंत गावडे,**

वय – ४३ वर्षे, व्यवसाय — धुणे–भांडी,

रा. नेताजी नगर, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.भांडारकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

१. फिर्यादी माझी मुलगी आहे. आरोपी क्र.१ हा माझ्या मुलीचा पती, आरोपी क्र.२ ही सासू, आरोपी क्र.३ हे सासरे व आरोपी क्र.४ हे माझ्या मुलीचे दीर आहेत. आज आरोपी क्र.१ व २ न्यायालयात हजर आहेत.

२. माझी मुलगी व आरोपी क्र.१ यांचा विवाह दि.३०/०३/२०२१ रोजी माळेगाव, ता.बारामती येथे झाला. लग्नानंतर सुरुवातीचा एक महिना आरोपींनी माझ्या मुलीला व्यवस्थित नांदविले. त्यानंतर आरोपींनी माझ्या मुलीकडे माहेरहून १०,००,०००/– आण असा तगादा लावला. ते पैसे आरोपी नवीन घर बांधण्यासाठी मागत होता. आरोपी क्र.१ हा माझ्या मुलीला हाणमार करायचा व उपाशी ठेवायचा तसेच आरोपी क्र.२ ते ४ हे तिला शिवीगाळ करुन अपमानित करायचे. माझ्या मुलीने तिला होणाऱ्या त्रासाबाबत मला व तिच्या मावशी व काकांना सांगितले. त्यानंतर आम्ही तिच्या सासरी गेलो. आम्ही आरोपींना समजावून सांगितले की आमची परिस्थिती गरीब आहे. तरीदेखील आरोपी माझ्या मुलीला त्रास देत होते व शिवीगाळ करत होते. आरोपी क्र.१ तिला सतत हाणमार करायचा. त्यामुळे माझ्या मुलीने भिगवण पोलिस ठाणेत तक्रार दाखल केली.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.के.एस.धापटे यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

३. माझ्या मुलीचे शिक्षण लग्नाच्या वेळी १३ वी पर्यंत झाले होते आता ती पुढे शिकत आहे. हे खरे की, आमचे घर इंदापूर शहरात आहे. हे खरे की, आरोपींचे घर ग्रामीण भागात आहे. हे खरे नाही

की, आरोपी क्र.१ चे शिक्षण जास्त झाले नसुन त्याचे राहणीमान साधे आहे. हे खरे नाही की, माझ्या मुलीचे लग्न झाले तेव्हा आरोपी क्र.४ हा बारामती येथे कॉलेजला होता. हे खरे की, आरोपी क्र.३ हे अपंग आहेत. आम्ही लग्नाच्या वेळी आरोपींना किती शेती आहे याची चौकशी केली होती. त्यावेळी आरोपींनी त्यांची शेती २१ एकर असल्याचे सांगितले होते. आम्ही त्यांची शेती १९ ते २१ एकर आहे याची खात्री केली होती. हे खरे की, त्यांच्या शेतात ऊस व मका ही पिके असतात. हे खरे की, आरोपींचे सिमेंटचे पक्के घर पत्र्याच्या तीन खोल्या आहेत. आरोपींना वर्षाला शेतीतून २५ ते ३० लाखांचे उत्पन्न मिळते अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, आरोपींच्या घरी ५–६ गुरे आहेत. साक्षीदार सांगते एक गाय आहे. आरोपींना दुग्ध व्यवसायातून महिन्याला २० ते २५ हजार रुपये मिळतात अगर कसे ते मला माहिती नाही. आरोपींना बागायत शेती आहे याची तुम्ही चौकशी केली होती का या प्रश्नाला साक्षीदाराने अशी चौकशी केली नव्हती परंतु समोर बघितल्यावर पीके दिसली असे उत्तर दिले.

**४.** माझी मुलगी लग्नानंतर ६ महिने सासरी राहिली. लग्नानंतर मुलीला त्रास सुरु झाल्यावर आम्ही पोलिस ठाणेत तक्रार दिलेली नाही. हे खरे की, माझ्या मुलीच्या सासरच्या घरापासून भिगवण पोलिस ठाणे २ ते ३ किमी अंतरावर आहे. हे खरे की, आमचे इंदापूरचे घर ते इंदापूर पोलिस ठाणे हे अंतर देखील २ ते ३ किमी आहे. माझ्या मुलीकडून घर बांधण्यासाठी आरोपीकडून १० लाखाची मागणी केली म्हणून आम्ही पोलिस ठाण्यात तक्रार दिलेली नाही.

**५.** हे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने माझ्या मुलीला वकिलांमार्फत नांदायला येण्याकरिता नोटीस पाठविली. आम्ही आरोपी क्र.१ ला नांदायला नेण्यासाठी नोटीस पाठवली अगर कसे मला सांगता येणार नाही. हे खरे की, नांदायला घेऊन जाण्याकरिता आरोपी क्र.१ ने इंदापूर न्यायालयात अर्ज केला असुन त्या अर्जाचे कामी माझी साक्ष झाली आहे. हे खरे की, माझ्या मुलीने आरोपींविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत खटला दाखल केला आहे.

**६.** हे खरे की, आरोपींची घरची परिस्थिती सधन आहे. हे खरे नाही की, माझ्या मुलीचे लहानपण शहरात गेल्यामुळे तिला तिच्या सासरी खेड्यात करमत नव्हते. हे खरे की, आरोपींचा संपूर्ण दिनक्रम शेतीत जातो. हे खरे की, माझ्या मुलीला माहेरी शेतातील अगर गुरांची कामे नव्हती. हे खरे

नाही की, माझी मुलगी आरोपींना त्रास देत होती. हे खरे नाही की, माझ्या मुलीला नांदायचे नसल्याने ती स्वतः माहेरी आली. हे खरे नाही की, आरोपींनी माझ्या मुलीला शिवीगाळ, मारहाण व आमच्याकडून १० लाखाची मागणी केली हे सर्व खोटे सांगते. हे खरे नाही की, आम्ही आरोपींकडे जाऊन मध्यस्थी केली हे खोटे सांगतो. पोलिसांनी माझा जबाब किती तारखेला घेतला ते मला सांगता येणार नाही. अंदाजे माझा जबाब सन २०21 मध्ये घेतला. हे खरे नाही की, आरोपींना त्रास देण्यासाठी मी केस केली.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.09.30 18:13:02 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.३०/०९/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**

**ता.इंदापूर, जि.पुणे.**